नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक, पुणे विभाग पुणे यांचे कार्यालय.
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला, विधानभवनसमोर, पुणे.
फोन नं.-020-26119438 ई-मेल-dig.pune@igrmaharashtra.gov.in

सत्यमेव जयते

जा.क्र/नोंउपमनि/पुवि/ऑनलाईन लि. अॅन्ड ला.कावि-93/2021 दिनांक-05/02/2021

प्रति,

सह जिल्हा निबंधक वर्ग-1
पुणे शहर/ ग्रामीण

विषय - ऑनलाईन लिव्ह अॅण्ड लायसन्सचे दस्त महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश 2015 अन्वये वेळेत नोंदणीकृत होत नसल्याबाबत व इतर सेवा त्रुटीबाबत.

संदर्भ - श्री.सचिन सिंघवी, अध्यक्ष - असोसिएशन ऑफ रिअल इस्टेट एजंट, यांचा दि.05/02/2021 रोजीचा अर्ज.

उपरोक्त विषयी, संदर्भिय अर्ज या कार्यालयास प्राप्त झालेला असून, सदर अर्जाची प्रत यासोबत पाठविण्यात येत आहे.

तरी सदर तक्रारीत नमुद मुद्दयांच्या अनुषंगाने ऑनलाईन लिव्ह अॅण्ड लायसन्सचे दस्त नोंदणीसाठी प्राप्त झाल्यानंतर जास्तीतजास्त 2-3 दिवसांत दस्त नोंदणी करण्यात यावी, तसेच ऑनलाईन लिव्ह अॅण्ड लायसन्सचे दस्त नोंदणीसाठी जास्त प्रमाणात प्रलंबित असतील तर शनिवार/ रविवार सुट्टीच्या दिवशी सदर प्रलंबित कामाचा निपटारा करण्यासाठी कार्यालये चालू ठेवण्यात येऊन, सदर प्रलंबित कामाचा निपटारा करण्यात यावा व यापुढे सदरचे दस्त 2-3 दिवसापेक्षा जास्त कालावधीकरिता प्रलंबित राहणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. असे निर्देश आपल्या अधिनस्त सर्व दुय्यम निबंधक यांना देण्यात यावेत. व त्याअनुषंगाने अर्जदार यांना समुचित उत्तर देऊन या कार्यालयास अवगत करावे.

5-2-21.

( हिम्मत खराडे )
नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक
पुणे विभाग, पुणे

प्रत - श्री.सचिन सिंघवी, अध्यक्ष - असोसिएशन ऑफ रिअल इस्टेट एजंट रा.ए-1, इस्टेटस, दुकान नं.13, राजधानी कॉम्प्लेक्स, पुणे सातारा रोड, शंकर महाराज मठाशेजारी, धनकवडी, पुणे-411043

Scanned with CamScanner

तक्रार अर्ज

दिनांक 05/02/2021

नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक
पुणे विभाग, पुणे यांचे कार्यालय

| | |
|---|---|
| दिनांक 5 FEB 2021 | 5 Feb 2021 |
| लिपीक | |
| राजपत्री वर्ग-२ | |
| नोंदणी उपमहानिरीक्षक | |
| आवक क्रमांक | 626 |
| टेबल क्रमांक | 6 |

प्रति,
**नोंदणी उपमहानिरिक्षक व मुद्रांक उपनियंत्रक पुणे विभाग पुणे.**
पत्ता :– नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
विधानभवनासमोर, पुणे–411001

विषय :– ऑनलाईन लिव्ह ॲण्ड लायसन्सचे दस्त महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश 2015 अन्वये वेळेत नोंदणीकृत होत नसल्याबाबत व इतर सेवा त्रूटीबाबत...

संदर्भ :– 1) नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांची अधिसुचना कमांक का–9/आस्था–7/सेवा हमी–315/2015 दिनांक 23/07/2015

2) महसुल व वन विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र कमांक आस्थाप–2016/प्र.क.534/म–1, दिनांक 29/01/2018

3) नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांची सुधारित अधिसुचना कमांक का–9/आस्था–7/सेवा हमी–315/2015, दिनांक 28/08/2018

अर्जदार :– **श्री. सचिन सिंघवी, अध्यक्ष– असोसिएशन ऑफ रिअल इस्टेट एजंट, मो. क. 9850222880**
रा. ए–1, इस्टेटस, दुकान नं. 13, राजधानी कॉम्प्लेक्स, पुणे सातारा रोड, शंकर महाराज मठाशेजारी, धनकवडी, पुणे 411043

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरून अर्ज करतो की, आपले विभागाने नागरिकांनकरिता काही सेवा ऑनलाईन उपलब्ध करून दिलेल्या आहेत. त्यापैकीच ऑनलाईन लिव्ह ॲण्ड लायसन्सचा करारनामा आता कोठुन ही कधीही जमा करता येतो. सध्या अनेक प्रकारचे अडचणी, समस्या, तक्रारी होत आहेत याकरिता आपण आपले अधिकाराचा वापर करून प्रशासनातील त्रुटी दुर करण्यात यावेत.

नोंदणीकृत करारनामा करण्याचा ओढा वाढत असुन शासकीय कामकाजाकरिता पत्ता पुरावा म्हणुन तसेच आरटीओ गाडीखरेदीसाठी, सोसायटीमध्ये प्रवेश करण्याकरिता, बॅंकेचे खाते काढण्याकरिता, आधार पत्ता बदलण्याकरिता, आरटीआय भरण्याकरिता अशा अनेक कारणांकरिता नागरिकांना आवश्यकता असते. परंतु शासकीय कामकाजाविषयी लोकांचे मनामध्ये संभ्रम व नकारात्मक प्रभाव उमटत आहे.

जेष्ठ नागरीक, गृहिणी, नोकरदार यांना या सुविधेचा त्रास होण्यास सुरूवात झाली आहे. अनेकजन नागरिक भाडेकरू, मालक, साक्षीदार यांना एकत्र करण्याची कसरत करावी लागत आहे. त्यांचे वेळेचे नियोजन करणे दिवसेंन दिवस अवघड होत चालले आहे. त्यामध्ये वारंवार सर्व्हरचा तांत्रिक बिघाड होत असतो, तसेच दस्त नोंदणीस सादर केल्यानंतर 15 ते 30 दिवसापर्यंत दस्त नोंदणी होवुन मिळकत आहे.

**1) दुय्यम निबंधक संबधीत तकारी :–**

**1) प्रस्तुतचा दस्त जमा केल्यानंतर ज्या दुय्यम निबंधक कार्यालयामध्ये जाईल त्या कार्यालयास तो दस्त त्याच दिवशी नोंदणी करणे वर नमुद संदर्भानुसार अनिवार्य आहे. परंतु संपुर्ण पुणे जिल्हयामध्ये सध्या दस्त नोंदणी होण्याकरिता 10 ते 30 दिवसांचा कालावधी लागत आहे. ही आपले विभागाचे सह जिल्हा निबंधक, नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक, यांचे कोणत्याही प्रकारचे नियोजन तथा कार्यालयीन कामकाजामध्ये लक्ष राहीले नसुन वर नमुद केलेले कायदयाचे सर्रास उल्लघन करत आहेत. तसेच सरकारी कामामध्ये मुदामहुन दस्त नोंदणी दिवसेंदिवस करणेचे टाळत आहेत. संदर्भात अधिसुचनेमध्ये नमुद केलेले कालावधीमध्ये दस्तांची नोंदणीची त्याच दिवशी करण्याचे आदेश संबंधीत दुय्यम निबंधक यांना देण्यात यावेत.**

**2) ऑनलाईन दस्त नोंदणीकरिता लिपीक (क्लार्कची) नियुक्ती करावी व अधिकार देण्यात येवुन दस्त नोंदणी करावी. याकरिता राज्यातील सर्व नोंदणी कार्यालयात प्रत्येक दोन बायोमॅट्रिक, कॅमेरा (एक राखीव) खरेदी करून उपलब्ध करून देण्यात यावा. सर्वाकडे एक राखीव संगणक उपलब्ध असुन गरज पडल्यास आणखीन संगणकांची मागणी करण्यात यावी.**

93
1/12

Scanned with CamScanner

3) कोर्टामध्ये दावा दाखल करते वेळी सर्टीफाईड कॉपीची आवश्यक्ता असते त्यामुळे ऑनलाईन लिव्ह ॲण्ड लायसन्स दस्ताचे सुची क्. 2 व दस्ताची प्रमाणित प्रत देण्याविषयी आदेशीत करण्यात यावे.

4) दैनंदिन पेंडींग दस्ताचा रिपोर्ट मागविण्यात यावा. व झिरो पेंन्डसी कामकाज सुरू करण्यात यावे. याकरिता संबंधीत विभागास सुचना देण्यात यावेत.

वरील नमुद केलेप्रमाणे आपण योग्य त्या विभागाला आदेशीत कराल व सदरील सेवा सुरळीत चालु ठेवावा व वरील तक्रारीबाबत केलेले आदेश व अमंलबजाणी संदर्भात पत्र, माहिती पाठविण्यात यावी ही नम्र विनंती.

कळावे आपला विश्वासु,

श्री. सचिन सिंघवी,
अध्यक्ष– असोसिएशन ऑफ रिअल इस्टेट एजंट,
मोबाईल क्. 9850222880